**<u>अर्जदाराचा उलटतपास : सामनेवाला क्र. 1 ते 3 तर्फे श्री. आर. बी. मुळे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. हे म्हणणे खरे आहे की, महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर एजेंसीमार्फत मी महानगरपालिकेत सेक्युरिटी म्हणून कामाला लागलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, महानगरपालिकेने बाकीच्या शाळांना सुरक्षा रक्षक पुरवलेले होते. हे मला माहिती नाही की, सुरक्षा रक्षकांचे सर्व बिल तयार करून मंजूरीसाठी महानगरपालिकेमध्ये पाठवले जात होते. मला पगार रोख स्वरूपात देत होते. मला पगार महाराणा सेक्युरिटी एजेंसी मला रोख स्वरूपात देत होते. हे म्हणणे खरे आहे की, महाराणा सेक्युरिटी एजेंसी हजेरीप्रमाणे मला महिन्याला रोख पगार देत होती. मला 2016 ते 2017 या कालावधीमधील पगार महाराणा सेक्युरिटी एजेंसीने दिलेला आहे. माझा शाळेकडे दोन वर्षाचा पगार थकीत आहे.

2. शाळेने मला नियुक्तीपत्र दिलेले नाही. मला फक्त हजेरीपत्रक दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, शाळेकडून माझी हजेरी घेत होते व मला हजेरीपत्रक देत होते. मी महानगरपालिकेकडे थकीत पगार देण्यासाठी मागणी केली होती. माझे महाराणा सेक्युरिटीकडे काहीही देणे घेणे राहिलेले नाही. महाराणा सेक्युरिटीज थोडे थोडे पैसे देत होते. मला महाराणा सेक्युरिटीकडून आज काहीही देणे घेणे बाकी नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जामध्ये व शपथपत्रामध्ये किती पगार येणे बाकी होता व मी किती दिवस सन 2017 ते 2019 या कालावधीमध्ये काम केले त्याबाबत तपशील नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, महानगरपालिकेचा माझेशी काहीही संबंध नाही, मी महाराणा सेक्युरिटी एजेंसीतर्फे कामाला लागलेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझेमध्ये व महानगरपालिकेमध्ये कोणतेही मालक व नोकर नाते नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन 2017 ते 2019 या कालावधीतील संपुर्ण पगार महाराणा सेक्युरिटी यांना दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला महानगरपालिकेच्या विरूध्द प्रस्तुतचा दावा चालवण्याचा अधिकार नाही.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by
DATTATRAY SHANKARRAO
KHEDEKAR
Date: 2026.01.06 10:59:45
+0530

**(द.शं.खेडेकर)**

दिनांक–05/01/2026

न्यायाधीश,

कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद